क्रमांकःपोमसं/२८-अे/४९३७/पो.क.नि.नियमावली/४२(१२)/२०१५, मुंबई, दिनांक : .९.२०१५

2 9 SEP 2015

**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं /२८-अे / ४९३७ / पोकनि. नियमावली / ४२ / २०१२, दि. ३०.०७.२०१२.

**विषय :-** पोलीस कल्याण निधी नियमावली सुधारित करणेबाबत.

********

शासनाने त्यांचे गृह विभाग, पत्र क्र. संकीर्ण ०४१२/प्र.क्र.२२५/पोल-७, दि.४.५.२०१२ अन्वये पोलीस कल्याण निधीबाबत सुधारित नियमावली तयार करुन, त्याप्रमाणे कार्यवाही करणेसंबंधात सर्व घटक प्रमुखांना सूचना देणेबाबत या कार्यालयास निर्देश दिलेले आहेत.

सदर नियमावलीतील नियमांमध्ये मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या प्रत्येक सहामाही बैठकीतील ठरावानुसार झालेल्या सुधारणांचा समावेश करुन, संदर्भाधीन परिपत्रकान्वये पोलीस कल्याण निधी नियमावली-२०१२ निर्गमित करण्यात आली होती. तेंव्हापासून ते आतापर्यंत वेळोवेळी झालेल्या सर्व सुधारणांचा व कालपरत्वे बदलांचा समावेश करुन, महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीची सुधारित नियमावली-२०१५ तयार करण्यात येवून सोबत जोडली आहे.

सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर नियमावलीतील सर्व नियमांचे तंतोतंत व काटेकोरपणे पालन करुन, त्यानुसार पोलीस कल्याण निधीची उभारणी व विनियोग करावा. तसेच प्रत्येक चौमाही वर्गणी संबंधीतांकडून वेळीच गोळा करुन, एकूण जमा रक्कमेचे तसेच त्यांच्या घटकांद्वारे राबविण्यात आलेल्या सर्व उपक्रमांतील निव्वळ नफ्याचे २५% प्रमाणे येणारी रक्कम मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी वेळीच या कार्यालयास पाठविण्यात यावी.

२८/९

**( संजीव दयाल )**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

महासंचालक, अँटी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह अग्रेषित)

अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल /नाहसं/ वाहतूक/लोहमार्ग/विशेष कृती/द.वि.प., मुंबई /न.वि.अ.,नागपूर.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मुंबई वगळून)

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.रा., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १५
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये (रा.रा.पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंडसह)
उप संचालक, डी.टी.एस. नाशिक.

प्रत माहितीकरिता,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

प्रत माहितीकरिता,

वरिष्ठ उप सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (आस्था-१) / (नि.वे.)
सर्व उप सहाय्यक पोलीस महानिरीक्षक
सर्व कार्यासन अधिकारी

प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, म.रा. यांचे कार्यालय, मुंबई.

२. प्रभारी अधिकारी यांनी www.mahapolice.gov.in वर असलेली पोलीस कल्याण निधी सुधारित नियमावली-२०१२ काढून टाकावी व सोबत जोडलेली पोलीस कल्याण निधी सुधारित नियमावली-२०१५ www.mahapolice.gov.in वर प्रसिध्द करुन, तसे कार्यासन क्रमांक २८-अे यांना कळवावे.

प्रत सादर अग्रेषित,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,गृहविभाग, मंत्रालय, मुंबई.

२. यांना त्यांचे गृह विभाग, पत्र क्र.संकीर्ण ०४१२/प्र.क्र.२२५/पोल-७,दि.४.५.२०१२ ला अनुसरून.

---ooo---

E:\Desk 28-A\D.G.Police Niyamavali Desk 28-A.doc

# महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली

(सुधारित नियमावली - २०१५)

**(शासन पत्र, गृह विभाग, क्र. पीडब्ल्यूएफ - ०३७२ / ३००९५ - पोल-७, दि.२२.०२.१९८० अन्वये शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली, १९८० च्या मूळ नियमावलीमध्ये दि. ०६.०७.२०१५ पर्यंतच्या मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या वेळोवेळी झालेल्या सहामाही बैठकीतील निर्णय/शासन आदेश/परिपत्रके या सुधारित नियमावलीमध्ये अंतर्भूत केलेली आहेत.)**

# महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली
# (सुधारित नियमावली - २०१५)
## अनुक्रमणिका



| अ. क्र. | नियम/उपनियम / परिपत्रक / शासन निर्णय क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| **१.** | **२.** | **३.** | **४.** |
| १. | १ | नांव व पत्ता | २ |
| २. | २ | प्रयोजन व उद्दिष्टे | २ |
| ३. | ३ (अ) व (ब) | सदस्यत्व | ३-४ |
| ४. | ४<br>(१) अ ते इ<br>(२) | निधीचे प्रशासन<br>मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी प्रशासन<br>घटक पोलीस कल्याण निधी प्रशासन | ४-५ |
| ५. | ५ (१) एक ते चार व (२) | घटक पोलीस कल्याण निधी सल्लागार समिती | ५-६ |
| ६. | ६ (अ) व (ब) | वैयक्तिक खातेवही लेखा व तो चालवणे | ६-७ |
| ७. | ७ (अ) ते (फ) | निधीची वर्गणी | ७-८-९ |
| ८. | ८ (१) अ ते इ व (२) अ ते एन (फ )(ग) १ ते २, एन (एक ते चार) | मध्यवर्ती / घटक पोलीस कल्याण निधीची साधने | ९ ते १३ |
| ९. | ९ (१) अ ते एन, (२) अ व ब, (३), (४) आणि(५) | मध्यवर्ती / घटक पोलीस कल्याण निधीचा विनियोग | १३ ते २१ |
| १०. | १० (१) ते (८) १ व २ | निधीचे लेखे, लेखापरिक्षा, अभिलेख, नोंदवह्या, मानधन इत्यादी | २१-२२ |
| ११. | ११ | पोलीस कल्याण अधिनियम तयार करण्याचे प्राधिकार | २२-२३ |
| १२. | १२ | निरसन व व्यावृत्ती | २३ |
| १३. | परिशिष्ट अ | सदस्यत्व स्वीकृति प्रतिज्ञापत्र | २४ |
| १४. | परिशिष्ट ब | घटक - मागणी नोंदवही | २५ |
| १५. | परिशिष्ट क | पावती | २६ |
| १६. | परिशिष्ट ड | कॅश मेमो | २७ |
| १७. | परिशिष्ट इ | पोलीस कल्याण निधीच्या पैशाची पोचपावती | २८ |

# -: महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली :-

## (सुधारित नियमावली - २०१५)

**(शासन पत्र, गृहविभाग, क्र.पीडब्ल्यूएफ-०३७२/३००९५-पोल-७,दि.२२.०२.१९८० अन्वये शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली, १९८० च्या मूळ नियमावलीमध्ये आतापर्यंत मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या वेळोवेळी झालेल्या सहामाही बैठकीतील निर्णय / शासन आदेश / परिपत्रके याद्वारे पोलीस कल्याण निधी नियमावलीमध्ये करण्यात आलेल्या सर्व सुधारणा, या सुधारित नियमावलीमध्ये अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.)**

### १. नांव व पत्ता :-

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई वगळता महाराष्ट्र राज्याचे पोलीस बलाकरिता **"पोलीस कल्याण निधी"** या नावाचा एक निधी असेल. हा निधी, मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी आणि गुन्हा अन्वेषण विभाग, आयुक्तालय, जिल्हा, राज्य राखीव पोलीस बल गट, मोटार परिवहन विभाग, बिनतारी संदेश विभाग, प्रशिक्षण संस्था, राज्य गुप्तवार्ता विभाग, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, विशेष कृती दल, फोर्स वन किंवा मध्यवर्ती पोलीस कल्याण मंडळाचे सल्ल्याने पोलीस महासंचालक ठरवतील, असे व इतर प्रादेशिक पोलीस संघटना / युनिट यांचा समावेश असलेल्या प्रत्येक प्रशासकीय युनिटच्या संबंधात घटक पोलीस कल्याण निधी यांचा मिळून बनविलेला असेल.

### २ प्रयोजने व उद्दिष्टे :-

पोलीस कल्याण निधी हा कल्याणकारी निधी आहे. केवळ निधीचे सदस्य आणि त्यांचे कुटुंबिय यांच्याच कल्याणासाठी निधीमधील उपलब्ध साधन संपत्तीमध्ये पार पाडल्या जातील, अशा काही उपाययोजना सुरु करणे आणि राबविणे, हे या निधीचे मुलभूत उद्दीष्ट आहे. तसेच परस्परात सहाय्य व सहकार्य करण्याच्या तत्त्वावर निधीचा विनियोग आधारलेला आहे.या प्रयोजनासाठी “कुटुंब” या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र नागरी सेवा - १९८१ ( सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम क्र. ०९ (१६) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असेल.

**३ <u>सदस्यत्व :-</u>**

**( अ )** **पोलीस विभागातील सर्व दर्जाचे पोलीस अधिकारी / कर्मचारी सेवेत कार्यरत असतांना पोलीस कल्याण निधीचे सदस्य राहतील व ते या विभागातील त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून निधीचे सदस्य आहेत, असे गृहीत धरण्यात येईल. परंतु, या विभागातील कायमच्या नियुक्तीवरील पोलीसेत्तर पदांवरील शासकिय सेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना निधीचे सदस्यत्व ऐच्छिक राहील.** पोलीस विभागामध्ये **कायमस्वरुपी** नेमलेल्या शासकिय कर्मचाऱ्यांनाच फक्त यामध्ये सहभागी होता येईल. **( दि. २४.११.२०१४ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक २८- अे / ४९३७ / मपोकनिबै / ४३९ / २००५, १२.०२.२०१५).** पुर्ण थकबाकीसह विहित वर्गणी दिल्यानंतरच सदस्यत्व चालू होईल. यानंतर निधीमध्ये सदस्य म्हणून दाखल होऊ इच्छिणारा शासकिय कर्मचारी, या नियमांना जोडलेल्या **परिशिष्ट "अ"** अन्वये विहीत केलेल्या प्रपत्रानुसार प्रतिज्ञापत्र लिहून देईल. त्याची पोलीस विभागामध्ये नियुक्ती झालेल्या तारखेपासून देय असलेल्या वर्गणीच्या थकबाकीची रक्कम देईल. तसेच तो पोलीस विभाग सोडून जाईपर्यंत त्याला निधीचा सदस्य म्हणून नाव मागे घेण्याची परवानगी देण्यात येणार नाही. **पोलीस कल्याण निधीच्या सदस्यांची चौमाही वर्गणी त्यांच्या वेतनातून कपात करुन निधीमध्ये जमा करण्यात येईल.**
**[दि.२४.११.२०१४च्या बैठकीतील निर्णय ( मुद्दा क्र. ब-२२ ) आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं / २८-अे /४९३७/मपोकनिबै/४३९/२००५, दि.३०.१२.२०१४.]**

**(ब)** या नियमामध्ये अन्यथा निर्देशित केले असेल, त्या व्यतिरिक्त, निधीचा सदस्य म्हणून स्विकृत करुन घेतलेल्या पोलीस विभागातील शासकिय कर्मचारी त्या-त्या वेळी ज्या घटकामध्ये त्यांची नियुक्ती झालेली असेल, त्या-त्या घटकांच्या घटक पोलीस कल्याण निधीमध्ये वर्गणी देईल. दुसऱ्या एखाद्या घटकामध्ये सभासदाची बदली झाल्यास, निधीच्या संबंधात त्याचे काही दायित्व असेल, तर, त्या दायित्वासह त्याचे सदस्यत्व नवीन घटकाच्या निधीमध्ये बदली होईल. अशा दायित्वाची जी रक्कम असेल तेवढी ठोक रक्कम नवीन घटकाच्या पोलीस कल्याण निधीमधून जुन्या घटकाच्या पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करुन, दायित्व बदली करण्यात येईल. त्यानंतर, तो

सदस्य त्याची बदली ज्या घटकात झालेली असेल, त्या घटकाच्या कल्याण निधीत त्याची अदत्त देय रक्कम देण्यास पात्र ठरेल.

## ४. निधीचे प्रशासन :-

१) अ) मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीचे प्रशासन, पोलीस महासंचालक यांचे कडून, मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी मंडळाच्या धोरणाविषयक निर्देशांच्या अधीनतेत करण्यात येईल. मंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :-

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | :- | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| उपाध्यक्ष | :- | अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) |
| सचिव व कोषाध्यक्ष | :- | विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) |
| सदस्य | :- | मध्यवर्ती पोलीस कल्याण मंडळ समितीच्या सदस्यांची नियुक्ती, मंडळाचे अध्यक्ष तथा पोलीस महासंचालक हे त्यांचे अधिपत्याखालील घटक प्रमुखांमधून दर २ वर्षांनी करतील. |

**(ब)** मंडळाची सभा आवश्यक असेल त्या-त्या वेळी, परंतु सहा महिन्यातून निदान एकदा घेण्यात येईल.

**(क)** मंडळ, निधीच्या सदस्यांच्या कल्याण कार्याच्या संबंधातील धोरणे स्थुल मानाने विहीत करील आणि त्यांचे पुनर्विलोकन करील.

**(ड)** मंडळ, मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधील निधीच्या रकमेचा त्याचप्रमाणे विशेष परिस्थितीत मंडळास वेळोवेळी आवश्यक वाटेल त्यानुसार कल्याणकारी प्रयोजनासाठी घटक पोलीस कल्याण निधीमधील रकमेचा विनियोग करण्यास सक्षम असेल.

**(इ)** मंडळ, विशेष परिस्थितीत, मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधील रक्कम घटक पोलीस कल्याण निधीमध्ये वर्ग करण्याचा किंवा एका घटक पोलीस कल्याण निधीमधील रक्कम दुसऱ्या घटक पोलीस कल्याण निधीमध्ये तात्पुरत्या अथवा कायमस्वरुपी वर्ग करण्याचे निर्देश देण्यास सक्षम असेल.

**२)** घटक पोलीस कल्याण निधीचे प्रशासन घटक प्रमुखाकडून (अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे, आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई, आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, जिल्हयाचे पोलीस अधीक्षक, राज्य राखीव पोलीस बल गटाचा

समादेशक, मोटारपरिवहन विभागाचा प्रभारी पोलीस अधीक्षक, संचालक, पोलीस बिनतारी संदेश किंवा प्रकरण परत्वे, प्रशिक्षण संस्थाचे, प्राचार्य) पोलीस महासंचालक तथा मध्यवर्ती पोलीस कल्याण मंडळाचे अध्यक्ष यांच्या नियंत्रणाच्या व निर्देशाच्या अधीनतेने करण्यात येईल. जिल्ह्याच्या आणि राज्य राखीव पोलीस बल गटाच्या घटक पोलीस कल्याण निधीचा कारभार त्या-त्या ठिकाणच्या परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरिक्षकांच्या आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बलांच्याही परिवेक्षीय नियंत्रणाचे अधीन राहील.

## ५. घटक पोलीस कल्याण निधी सल्लागार समिती :-

**१) पुढील प्रमाणे घटक पोलीस कल्याण निधी सल्लागार समितीची स्थापना करण्यात येईल.**

**(एक) अध्यक्ष :-** अपर पोलीस महासंचालक,गु.अ.वि.,पुणे,
आयुक्त,रा.गु.वि.,म.रा.,मुंबई,
अपर पोलीस महासंचालक व संचालक, बिनतारी संदेश विभाग,पुणे,
आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त,
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक आणि महाराष्ट्र गुप्तवात
प्रबोधिनी, म.रा.,पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक (मो.प.वि.)
जिल्हा पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण संस्था

**(दोन) (अ) सदस्य :-** विशेष पोलीस महानिरीक्षक,गु.अ.वि.पुणे, सह आयुक्त, रा.गु.वि.मुंबई,
आयुक्तालयातील पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) / जिल्हयाच्या मुख्यालयामध्ये अपर पोलीस अधीक्षक / पोलीस उप अधीक्षक (गृ
/उपविभागीय पोलीस अधिकारी - प्रकरणपरत्वे
सहाय्यक समादेशक,राज्य राखीव पोलीस बल/पोलीस अधिक्षक,मोट
परिवहन/बिनतारी संदेश/उपप्राचार्य पोलीस प्रशिक्षण विद्यालय/केंद्र

**(ब)** युनिटमधील वरिष्ठता पोलीस निरीक्षक किंवा वरिष्ठतम फौजदार ते आळीपाळीने प्रत्येकी दोन वर्षाच्या कालावधीकरिता समितीचे काम पाहतील.

**(क)** जिल्ह्यातील सहाय्यक पोलीस फौजदार ते पोलीस शिपाई पर्यंतच्या हुद्यावरील एक पोलीस कर्मचारी (पोलीस मुख्यालयातील कर्मचारी वगळून).

**(तीन)** **सदस्य :-** कल्याण कार्याचे कामकाज पाहणारे

**(चार)** **सचिव :-** पोलीस अधीक्षक, गु.अ.वि., म.रा., पुणे.
उप आयुक्त (प्रशासन), रा.गु.वि., मुंबई.
आयुक्तालयातील सहाय्यक पोलीस आयुक्त.
जिल्ह्याचा पोलीस निरीक्षक (कल्याणकारी शाखा/स्थानिक गुन्हे शाखा).
सहाय्यक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.
मुख्यालयाचा पोलीस निरीक्षक.
मोटार परिवहन / प्रशिक्षण संस्थेतील वरिष्ठतम पोलीस निरीक्षक.

**२)** सल्लागार समितीची बैठक, आवश्यक असेल तेव्हा, परंतु सहा महिन्यातुन निदान एकदा घेण्यात येईल. आणि प्रशासकाकडुन घटकाच्या निधीचा विनियोग विधायक प्रकारे करण्यासाठी, निधीच्या सदस्याच्या कल्याणाशी संबधीत असलेल्या कोणत्याही सर्वसाधारण वा विशेष समस्यांच्या बाबतीत घटकाच्या प्रमुखांना सल्ला देण्यास समिती सक्षम असेल. घटक पोलीस कल्याण निधीचा विनियोग पोलीस कल्याण निधीमधील नियमावलींच्या / तरतुदींच्या अधिन राहुन करण्याची जबाबदारी घटक पोलीस कल्याण निधी सल्लागार समितीची असेल.

## ६. वैयक्तिक खातेवही लेखा व तो चालवणे :-

**अ)** मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीचा पैसा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामध्ये चालु खात्यावर ठेवण्यात येईल आणि तो पोलीस महासंचालक / मध्यवर्ती पोलीस कल्याण **निधी** मंडळाचे अध्यक्ष यांचेकडून अथवा अध्यक्षांनी प्राधिकृत केल्यास मंडळाचे सचिवाकडून वैयक्तिक खाते वही लेखा म्हणुन वापरण्यात येईल. **तसेच मध्यवर्ती पोलीस कल्याण**

**निधी मंडळाचे अध्यक्ष तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे परवानगी देतील त्यानुसार त्यातील तेवढी रक्कम राष्ट्रीकृत किंवा शेड्युल्ड् बँकेत चालु / बचत खात्यावर व आवश्यकतेनुसार मुदतठेव स्वरुपात गुंतवण्यात येईल.**

**घटक पोलीस कल्याण निधीचा पैसा घटकाच्या मुख्यालयाचे ठिकाणी असलेल्या कोषागारामध्ये ठेवण्यात येईल** व निधीच्या प्रशासकाकडून / त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून वैयक्तिक खातेवही लेखा म्हणून त्याचा व्यवहार करण्यात येईल. **घटक प्रमुख यांना घटक पोलीस कल्याण निधीतील रक्कम संबंधित राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड् बँकेत चालु / बचत खात्यावर व आवश्यकतेनुसार मुदत ठेव स्वरुपात ठेवण्याची मुभा राहील. ( या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/ ४९३७ / मपोकनिधी (मुदतठेव) / १५५ / २०१३, दि.१४.२.२०१४)** तथापि, त्यातील निधीच्या वापरामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता होऊ नये याची घटक प्रमुख दक्षता घेतील. अन्यथा संभाव्य अनियमिततेस संबंधीत घटक प्रमुख सर्वस्वी जबाबदार राहतील.

मात्र, मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी किंवा घटक पोलीस कल्याण निधी अथवा त्यातील कोणतीही रक्कम पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे या बाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे परवानगी देतील, त्यानुसार अशा रीतीने ठेवण्यात किंवा गुंतवण्यात येईल.

**ब)** ज्या अधिका-यांच्या नांवाने वैयक्तीक खाते वही लेखा सुरु करण्यात आला असेल, त्याच्या पदीय नात्याने त्या संबंधातील व्यवहार करील. असा प्राधिकारी, त्याला पदीय नात्याने दुय्यम असलेल्या व्यक्तीकडे निधीच्या प्रशासनाच्या प्रयोजनासाठी एखादे काम सोपवू शकेल. त्यांना एखादे काम नेमून देऊ शकेल किंवा त्याच्या सेवेचा वापर करु शकेल आणि निधीच्या प्रशासनाच्या संबंधात अशा प्रकारे काम सोपविलेल्या व्यक्ती अथवा काम नेमून दिलेल्या व्यक्ती ती कामे त्याच्या पदीय नात्याने करतील.

## ७. <u>निधीतील वर्गणी</u> :-

**अ)** **निधीच्या सदस्याकडून देय असलेल्या वर्गणीचा दर पुढील प्रमाणे असतील :-**

| अ. क्र. | पदनाम | पोलीस कल्याण निधी, चौमाही वर्गणीच्या रकमेचे कालावधीनिहाय दर ( रुपये ) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३/९८ पर्यंत | ४/९८ ते ८/११ | ९/२०११ ते ८/२०१३ | ९/२०१३ पासून |
| १. | पोलीस महासंचालक / अपर पोलीस महासंचालक | ४०.०० | १००.०० | २००.०० | **५००.००** |
| २. | विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक / पोलीस अधीक्षक | २०.०० | ७५.०० | १५०.०० | **३५०.००** |
| ३. | पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त | १३.५० | ५०.०० | १००.०० | **२५०.००** |
| ४. | पोलीस निरीक्षक/सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उप निरीक्षक | १२.०० | ३०.०० | ६०.०० | **१५०.००** |
| ५. | सहायक पोलीस उप निरीक्षक ते पोलीस शिपाई | ०४.०० | २०.०० | ४०.०० | **१००.००** |
| ६. | पोलीस महानिरीक्षक यांचे वरिष्ठ उप सहायक (गट अ) | १७.०० | ७५.०० | १५०.०० | **३५०.००** |
| ७. | पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहायक (गट ब) | १३.५० | ५०.०० | १००.०० | **२५०.००** |
| ८. | प्रशासकीय अधिकारी / वरिष्ठ कार्यालय अधीक्षक/ कार्यालय अधीक्षक / लघुलेखक | १२.०० | ३०.०० | ६०.०० | **१५०.००** |
| ९ | प्रमुख लिपिक/लिपिक कर्मचारी कार्यालयीन शिपाई व स्वच्छक (गट-ड) | ०८.०० | २०.०० | ४०.०० | **१००.००** |

**(दि. १३.८.२०१३ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/ मपोकनिस बैठक/४३९/२००५, दि. ९.१०.२०१३.)**

**ब)** वर्गणीच्या वसुलीच्या संबंधात, परिशिष्ट “ब” मधील नमुना एक प्रमाणे, मागणी नोंद वही ठेवण्यात येईल. परिशिष्ट “क” मधील नमुन्यात सर्व सदस्यांना पावत्या देण्यात येतील. वर्गणी वसुल करणारा अधिकारी, वसुल केलेली रक्कम, ती ज्या कालावधीच्या संदर्भातील असेल, त्या कालावधीसाठी मागणी नोंदवहीच्या संदर्भातील असेल त्या मागणी नोंदवहीच्या सत्य प्रतिसह परिशिष्ट “ड” मध्ये दर्शविलेल्या नमुन्यातील रोखीच्या पावतीसह घटक पोलीस कल्याण निधीच्या प्रशासकाकडे पाठवील.

**क)** घटक कल्याण निधीचा प्रशासक, परिशिष्ट “इ” मध्ये दिलेल्या नमुन्यात, त्या रकमेची पोचपावती देईल. निरीक्षण अधिकारी, वार्षिक तपासणीच्या वेळी मागणी नोंदवहीची

तपासणी करेल आणि वसुली अचुकपणे करण्यात येत असल्याची खात्री करुन घेईल.

**ड)** छापील पावती पुस्तके व रोखीची पुस्तके वापरण्यात येतील आणि छपाई खर्च निधीमधून करण्यात येईल.

**इ)** एखाद्या सदस्याची एका घटकामधून दुसऱ्या घटकामध्ये बदली झाल्यास, त्याने त्याच्या जुन्या निधीमध्ये वर्गणी भरलेली असेल तर त्याने त्या कालावधीसाठी पुन्हा वर्गणी देणे आवश्यक असणार नाही.

**फ)** **सभासदांच्या चौमाही वर्गणीची कपात त्यांच्या एप्रिल, ऑगस्ट व डिसेंबर या महिन्याच्या वेतनातून करण्यात येईल.**

## ८. निधीची साधने :-

**१) मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी पुढील रकमांद्वारे उभारण्यात येईल.**

**अ)** घटक पोलीस कल्याण निधीमध्ये त्यांच्या सदस्याकडुन गोळा करण्यात आलेल्या एकूण चौमाही वर्गणीच्या आणि घटक कल्याण निधी वृध्दींगत करण्यासाठी घटकांद्वारे राबविण्यात आलेल्या / येणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रम, इंधन आगारे (पेट्रोलपंप), मंगल कार्यालये, विश्रांतीगृहे, पोलीस क्लब, लॉन, बोटींग क्लब, वस्तुभांडार, सैन्य दलाच्या धर्तीवरील पोलीस कॅन्टीन सुविधा, पोलीस पब्लीक स्कुल, कुक्कुट पैदास क्षेत्रे, दुग्धशाळा, पिठाच्या गिरण्या, बेक-या, धान्य व किराणा मालाची दुकाने, गॅस एजन्सी, इत्यादी पोलीस कल्याण निधी उपक्रमांतील निव्वळ नफ्याच्या आणि घटक कार्यालयास पोलीस कल्याण निधी उपक्रमांतर्गतच्या कोणत्याही उपक्रमांसाठी, पात्र प्रतिष्ठीत खाजगी व्यक्ती / संस्था / बहुराष्ट्रीय कंपन्या यांचेकडून स्वेच्छेने देणगी म्हणून रोख स्वरुपात प्राप्त होणाऱ्या व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या (पो.म.सं./शासन) पुर्वमान्यतेने घटक पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यात येणाऱ्या रक्कमांच्या २५% प्रमाणे मिळणारी रक्कम.

**ब)** पोलीस महासंचालक म. राज्य, मुंबई, महासंचालक, अे.सी.बी., मुंबई, अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती / प्रशिक्षण / रारापोबल / वाहतूक / लोहमार्ग / द.वि.प. / फोर्स वन, मुंबई. ) यांच्या आणि त्यांच्या कार्यालयातील पोलीस कल्याण निधीच्या सर्व सभासदांकडून मिळालेल्या संपुर्ण (१००%) चौमाही वर्गण्या.

**क)** महाराष्ट्र शासनाकडुन मिळालेले अनुदान.

**ड)** पोलीस अधिकारी व इतर शासकिय कर्मचारी यांचेकडील देणग्या.

**इ)** निगम निकाय, सार्वजनिक संस्था, औद्योगिक व वाणिज्य केंद्रे, लायन्स क्लब, इत्यादी सारख्या सामाजिक संघटना व खाजगी व्यक्ती यांच्याकडुन या नियमातील (ब) मधील नमूद कार्यालयांना प्राप्त होणाऱ्या देणग्या.

**२)** **घटक पोलीस कल्याण निधी पुढील रकमांद्वारे उभारला जाईल :-**

**अ)(१)** सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक (रा.रा.पो.बलसह)हे त्यांचा व त्यांच्या कार्यालयातील पोलीस कल्याण निधीच्या सभासदांकडुन पो.क.निधीची वर्गणी जमा करुन, त्यांचे कार्यालय ज्या ठिकाणी कार्यरत असेल, त्या ठिकाणच्या किंवा नजीकच्या त्याच्या अधिपत्याखालील एका घटक कार्यालयातील घटक पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करतील.

**(२)** राज्यातील पोलीस विभागातील ए.सी.बी. / गु.अ.वि. / रा.गु.वि. पथक प्रमुखांनी त्यांचा व त्यांचे कार्यालयातील पोलीस कल्याण निधीच्या सभासदांकडून अदत्त चौमाही वर्गणी जमा करुन, जमा रक्कम, त्यांचे कार्यालय ज्या जिल्ह्यात कार्यान्वित आहे, अशा आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त आणि जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक यांना त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीत जमा करण्यासाठी पाठवतील. ते घटक सदरची रक्कम स्वत:चे घटक कल्याण निधीत जमा करुन, त्यातील २५% रक्कम मध्यवर्ती पो. क. नि. मध्ये जमा करण्यासाठी पो.म.सं. कार्यालयास पाठवतील व अशा कार्यालय / घटक / पथकातील अधिकारी / कर्मचारी यांना पो.क.नि.अंतर्गत अनुज्ञेय लाभ उपलब्ध करुन देतील.

**ब)** पोलीस मुख्यालयात लावलेल्या बागा, मळे इत्यादी पोलीस कल्याण उपक्रमातील उत्पादनाच्या विक्रीपासुनचे उत्पन्न.

**क)** पोलीस सहकारी पतसंस्थाकडील निव्वळ नफ्याच्या २०% ची रक्कम.

**ड)** पोलीस कल्याण निधीतुन संपूर्णपणे पैसा पुरविण्यात आलेला आहे, अशा सांस्कृतिक कार्यक्रम, इंधन आगारे (पेट्रोलपंप), मंगल कार्यालये, विश्रांतीगृहे, पोलीस क्लब, लॉन, बोटींग क्लब, वस्तुभांडार, सैन्य दलाच्या धर्तीवरील पोलीस कॅन्टीन सुविधा, पोलीस पब्लिक स्कूल, कुक्कुट पैदास क्षेत्रे, दुग्धशाळा, पिठाच्या गिरण्या, बेक-या, धान्य व किराणा मालाची दुकाने, गॅस एजन्सी, इत्यादी सारख्या उपक्रमामधुन मिळणाऱ्या निव्वळ नफ्याच्या ७५% इतकी रक्कम घटक पोलीस कल्याण निधीमध्ये जमा होईल व

उर्वरीत २५ % रक्कम मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा केली जाईल.

**इ)** अधिकाऱ्यांचे क्लब असल्यास, त्यांच्याकडील वर्गणी.

**ई)** क्रिडा महोत्सवात व स्पर्धामध्ये युनिट भाग घेते, तेव्हा मिळतील त्या रोख **पारितोषिकांच्या रकमेपैकी १०% रक्कम (८० % खेळाडू, १०% मध्यवर्ती पोलीस क्रीडा निधी) (या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/२८/६९०९/बक्षिस रक्कम/२०१/ २०१५, दि. ५/९/२०१५.)**

**फ)** पोलीस अधिकारी व इतर शासकिय कर्मचारी यांचेकडील देणग्या.

**ग) (१)** पात्र खाजगी संस्था / बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच खाजगी व्यक्तींकडून पोलीस महासंचालक यांच्या पूर्व परवानगीने स्विकारलेल्या रुपये ५,००,०००/- पर्यंतच्या **धनादेश/धनाकर्ष स्वरुपातील** देणग्या आणि शासनाच्या पूर्वपरवानगीने स्विकारलेल्या रु. ५,००,००० / - पेक्षा जास्त रकमांच्या **धनादेश / धनाकर्ष स्वरुपातील** देणग्या. **[दि. २४.११.२०१४ च्या बैठकीतील निर्णय ( मुद्दा क्र. ब-२१ ) आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं / २८-अे / ४९३७ / मपोकनिबै/ ४३९ / २००५, दि.३०.१२.२०१४.]** **मात्र, पोलीस विभागातील कामांशी संबंध येणारे बिल्डर / विकासक / बांधकाम कंत्राटदार / इन्फ्रास्ट्रक्चरर्स तसेच बांधकामाशी संबंधीत वाळू सिमेंट इत्यादिंचे विक्रेते / पुरवठादार, मद्य उत्पादक व विक्रेते, वाईन शॉप / बार / हॉटेल / रेस्टॉरंट अँन्ड बार / इत्यादिंचे मालक, गुटखा / तंबाखु / सिगारेट / इत्यादींचे उत्पादक व विक्रेते व तत्सम व्यावसायीकांकडून देणग्या स्विकारता अथवा प्रस्तावित करता येणार नाहीत. तसेच रु.१०,०००/- पेक्षा कमी रकमांच्या देणग्याही स्विकारता अथवा प्रस्तावित करता येणार नाहीत. ( या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं /२८-अे/४९३७/पोकनि-देणगी ५३ / २०१३, दि. १५.०५.२०१३ ) त्याचप्रमाणे ज्वेलर्स / सराफ व कोळसा खाण मालकांकडुनही देणग्या स्विकारता अथवा प्रस्तावित करता येणार नाहीत.**

**(२)** पात्र खाजगी संस्था / बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच खाजगी व्यक्तींकडून पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई आणि शासनाच्या पूर्व परवानगीने स्विकारलेल्या अनुक्रमे रुपये ५,००,०००/- पर्यंत आणि रु.५,००,०००/- पेक्षा जास्त किमतीच्या जागा तसेच ॲम्ब्युलन्स, संगणक व इतर विद्युत उपकरणे,वाहन इत्यादी वस्तु स्वरुपातील देणग्या.**(२०१२च्या नियमावलीमधील इमारत व बांधकाम (इन्फ्रास्ट्रक्चर) या बाबी वगळण्यात आल्या आहेत.)**

(या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं / २८-अे / पोकनि देणगी / ५३ / २०१३, दि. १५/५/२०१३)

**ह)** पोलीस महासंचालक यांच्या पुर्व परवानगीने निधी स्विकारणे व विनियोग करण्यासंबधी शासनाने तयार केलेल्या नियमांच्या अधिनतेने कोणत्याही अन्य मार्गाने मिळालेल्या देणग्या.

**आय)** गुन्ह्याचा शोध लावणे, संपत्ती परत मिळवून देणे, इत्यादीसाठी खाजगी व्यक्तींनी दिलेली व पोलीस महासंचालक यांच्या मंजूरीच्या अधीनतेने स्विकारलेली, पैशाच्या स्वरूपातील बक्षिसे.

**जे)** निधीमध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसल्यास आणि घटक प्रमुखांच्या स्वेच्छा निर्णयानुसार पोलीस बँड भाड्याच्या २५% इतकी रक्कम.

**के)** कल्याण निधीच्या रक्कमेच्या पोलीस महासंचालक यांनी प्राधिकृत केलेल्या गुंतवणुकांवरील व्याजाच्या रक्कमेद्वारे मिळणारा महसूल.

**एल)** घटक कल्याण निधीला त्यांच्या गरजेनुसार व उपलब्धतेनुसार मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीतून दिलेले अनुदान किंवा अग्रीम. **(पोलीस क्लब, विश्रामगृह, वसतीगृह, बहुउद्देशीय सभागृह इत्यादी उपक्रमाकरिता येणाऱ्या एकूण खर्चाच्या २५% रक्कम मध्यवर्ती कल्याण निधीमधून अग्रीम किंवा अनुदान स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येईल.) (कार्यालयीन परिपत्रक अपोमसं / २८-अे / ४९३७ क.उ. निधी / ११९ / २०११. दिनांक ५.११.२०११)**

**एम)** शामियाने व बहुद्देशीय सभागृहे, विश्रामगृहे, पोलीस क्लब, हॉलिडे होम इत्यादीं सारखा पोलीस कल्याण इमारती यांच्या भाडयातून मिळालेली रक्कम, मात्र, या सुखसोयीसाठीचे भाडे निधीच्या सदस्यांकडून कमी केलेल्या दरांनी घेता येईल.

**एन)** पुढील शर्तीच्या अधीनतेने आयोजित केलेले चित्रपट, नाटक, सर्कस, कुस्त्या सामने, फुटबॉल, हॉकी किंवा क्रिकेट सामने किंवा अन्य कोणताही हितार्थ कार्यक्रम यापासून मिळालेले उत्पन्न.

**(एक)** तिकीट विक्रीबाबत कोणताही शासकिय दबाव आणला जाणार नाही.

**(दोन)** खेळाचे प्रवेश दर, ज्या ठिकाणी हे खेळ आयोजित केले असतील तेथील चित्रपटगृहांच्या प्रवेशदराच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत ते दर प्रत्येक तिकीटास रूपये ५०० /- याहून अधिक असणार नाहीत. विशेष सांस्कृतिक कार्यक्रमासाठी हे दर प्रत्येक तिकीटामागे रूपये १०००/- पर्यंत वाढविता येईल.

(महाराष्ट्र शासन, गृहविभाग., निर्णय क्र.पीडब्ल्यूएफ - ०४०१ /३१९ / प्र.क्र.३ / पोल-७, दि. १५.०९.२००५.)

**(तीन)** पोलीस दलातील कोणतीही व्यक्ती लोकांना तिकीटे विकत घेण्यास सांगण्यासाठी घरोघरी जाणार नाही. मानार्थ तिकीटांच्या (Passes) बदल्यात कोणत्याही देणग्या मागितल्या जाणार नाहीत.

**(चार)** वर उल्लेखलेले खेळ / कार्यक्रम जेथे होणार असतील, त्या ठिकाणाहून अतिशय दूर असलेल्या कोणत्याही पोलीस ठाण्याकडे तिकीटे विकण्याचे काम दिले जाणार नाही. तसेच ट्रकड्रायव्हर आणि बेकायदेशीर व्यावसायिकांकडुन कोणत्याही प्रकारचा निधी स्वीकारु नये. अशा सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. त्यासाठी पोलीस महासंचालक यांचे परिपत्रक क्र. पोमसं / २८-अे / ४९३७ / कार्यक्रम परवानगी / ३४ / २०११, दि.१८.०३.२०११ मधील नमूद बाबींच्या पुर्ततेसह परिपूर्ण प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. तसेच दोन कार्यक्रमांच्या आयोजनांमध्ये किमान एक वर्षाच्या कालावधीचे अंतर असणेही आवश्यक आहे.

**टिप :-** पोलीस दलातील व्यक्तींना स्वतः नाटकाच्या प्रयोगात भाग घेता येईल. परंतु अशा प्रयोगामुळे त्यात भाग घेणा-या व्यक्तींच्या शासकिय कामकाजामध्ये अडथळा येता कामा नये.

## **९. <u>निधीचा विनीयोग</u> :-**

**(१)** पोलीस कल्याण निधी पुढील कारणांसाठी वापरण्यात येईल.

**(अ)** शासकिय रूग्णालयातून जी औषधे पुरविली जात नाहीत, अशी विशेष औषधे, औषधीद्रव्ये इत्यादींच्या स्वरूपातील वैद्यकिय सुविधा, अर्धांगवायू, पोलियो, कर्करोग, इत्यादीसारख्या विशिष्ट वर्गातील रोग बरे होण्याकरीता लागतील, अशी इतर उपयंत्र किंवा उपकरण संच यांच्या स्वरूपातील कर्ज किंवा अनुदान. आणि शासकिय कर्मचा-यांना द्यावयाच्या वैद्यकिय उपचारासाठींच्या त्यावेळी अंमलात असलेल्या नियमानुसार ज्यांच्या खर्चाची प्रतिपूर्ती केली जात नाही अशी श्रवणयंत्रे, कवळी, कृत्रिम अवयव इत्यादी सारखी उपयंत्रे **खरेदी करण्यासाठी कमाल रु.५,०००/- इतकी रक्कम तसेच चष्म्याकरिता कमाल रु. ५००/- इतकी रक्कम फक्त एकदाच संबंधित घटक पोलीस कल्याण निधीतून अनुदान म्हणून मंजूर करण्यात येईल.**

**(दि. ०३. १२. २०१२ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिस बैठक-अनु./४३९/२००५,दि. २७.०२.२०१३.)**

**(ब)** पोलीस विभागातील पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाचे अधिकारी / कर्मचारी तसेच लिपीक वर्गीय अधिकारी / कर्मचारी (पोलीस कल्याण निधीचे सभासद) आणि **राज्यातील विविध नक्षलवादी /अतिरेकी हल्ल्यांतील शहिद पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची २ मुले (दि. ०३.१२.२०१२ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/ मपोकनिस बैठक-पु.अ./४३९/२००५, दि. २७.०२.२०१३.)** यांना पाठ्यपुस्तके खरेदी करण्यासाठी, पुस्तक अनुदानाची सुविधा, ज्या शैक्षणिक वर्षात लागू होत असेल, त्यांच्या लगतपूर्वीच्या वार्षिक परिक्षेत खालील विवरणपत्रातील नमूद गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या मुला-मुलींना आणि अवलंबून असणा-या व्यक्तींना, त्यातील नमूद दरानुसार दिली जाईल :-

| **अ. क्र.** | **शैक्षणिक अभ्यासक्रम** | **टक्केवारी** | **पुस्तक अनुदानाचे दर रुपये** |
|---|---|---|---|
| १. | इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत. | ७५% गुण / ४ विषयात किमान ब-१ श्रेणी. | १,०००/- |
| २. | इयत्ता ११ वी व १२ वी. | ७५% | २,०००/- |
| ३. | पदवी व पदव्युत्तर (कला, वाणिज्य व विज्ञान), LLB/MBA/BBA/BCA/MCA/DBM/ D.Ed./B.Ed./ M.Ed./CA/BSc.(Agri.)/BSc(IT)/BMS/**Hotel Management/** Computer Degree & Diploma, ITI, etc. | ७५% | ३,०००/- |
| ४. | अभियांत्रिकी पदविका (Diploma) | ५५% | ३,०००/- |
| ५. | वैद्यकीय / **D-Pharm पदविका (Diploma),** | ५०% | ३,०००/- |
| ६. | अभियांत्रिकी पदवी (Degree) | ५५% | ७,०००/- |
| ७. | वैद्यकीय/**B-Pharm/M-Pharm पदवी (Degree)** | ५५% | १५,०००/- |

**( दि. १३.८.२०१३ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं / २८-अे / ४९३७ / मपोकनिबै-आ-१०/४३९/२००५, दि. ९.१०.२०१३.)**

तसेच, **वरील सुविधा ही राज्य पोलीस विभागात सेवेत असतांना कोणत्याही दिवंगत झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या २ पाल्यांना त्यांच्या नियत वयोमानानुसारच्या सेवानिवृत्ती दिनांकापर्यंत, पदवी किंवा इयत्ता १२ वी नंतर फक्त ३ वर्षापर्यंतच्या कोणत्याही अभ्यासक्रमासाठी उपलब्ध करुन देता येईल.**

**( दि. १३.८.२०१३ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं /२८-अे / ४९३७ / मपोकनिबै-इ-१ / ४३९ / २००५, दि. ९. १०. २०१३.)**

मात्र, पुस्तक अनुदान मंजूरीसाठी गुणपत्रकाची साक्षांकित प्रत निकालाच्या **तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.** **( दि. ६/७/२०१५ च्या बैठकीतील निर्णय व या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं / २८-अे / ४९३७ / मपोकनिबै / ४३९ (०५) /२०१५, दि. २५/८/२०१५)** तसेच प्रत्येक घटकांनी पुस्तक अनुदान मंजूर करतांना त्याबाबतची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक राहील.

**(क)** पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या परंतु पोलीस विभागात सेवेत असताना मृत पावलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या पत्नी / पतीला / जवळच्या नातलगाला अंत्यविधीचा खर्च भागविण्यासाठी रुपये **१२,०००/-** इतक्या रक्कमेचे "अंत्यविधी अनुदान" आणि त्यांच्या मूळ गावी, शव पोहचविण्यासाठी पोलीस वाहनांचा उपयोग केला असल्यास, त्या वाहनासाठी केलेल्या पेट्रोलच्या व इतर सर्व खर्चाची रक्कम.

**[ दि. २४.११.२०१४ च्या बैठकीतील निर्णय (मुद्दा क्र. ब-१८) आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं / २८-अे / ४९३७ / मपोकनिबै / ४३९ / २००५, दि.३०.१२.२०१४.]**

**(ड)** सेवेत असतांना, आपले कर्तव्य बजावत असतांना किंवा, अन्यथा मरण पावलेल्या पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाच्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटूंबियांना खालील दरांप्रमाणे दिल्या जाणा-या सानुग्रह अनुदानासाठी होणारा प्रारंभीक खर्च हा प्रथमतः संबंधीत घटकांद्वारे केला जाईल.

| अ. क्र. | पदनाम | सानुग्रह अनुदान (रु.) | | | १९ वर्षाखालील ३ मुलांपर्यंत प्रत्येकी सानुग्रह अनुदान (रु.) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९.७.१९७५ १४.९.२००५ पर्यंत | १५.९.२००५ ते २९.७.२०१२ पर्यंत | ३०.७.२०१२ पासून | १९.७.७५ ते १४.९.२००५ पर्यंत | १५.९.०५ ते ९.७.१२ पर्यंत | ३०.७.१२ पासून |
| १. | पो.नि./स.पो.नि. | ४,०००/- | १५,०००/- | ३०,०००/ | ३००/- | ५००/- | १,०००/- |
| २. | पोलीस उप निरीक्षक | ३,५००/- | १२,५००/- | २५,०००/ | ३००/- | ५००/- | १,०००/- |
| ३. | स.पो.उप निरीक्षक | ३,०००/- | १०,०००/- | २०,०००/ | २५०/- | ४००/- | ८००/- |
| ४. | पो.शि. व पो.हवा. | २,५००/- | १०,०००/- | २०,०००/ | २५०/- | ४००/- | ८००/- |
| ५. | कर्तव्य बजावितांना मृत्यू आल्यास **(पो.नि. ते पो.शि.)** | ५,०००/- | १५,००० | ५०,०००/ | निरंक | ५०० | १,००० |

या प्रारंभिक खर्चाची, पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांना शासनाने त्या वर्षासाठी मंजूर केलेल्या सहाय्यक अनुदानातुन प्रतिपूर्ती केली जाईल. मात्र त्यासाठी संबंधीत घटकाद्वारे त्याबाबतचा प्रस्ताव घटनेच्या १ महिन्याचे आत पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

(इ)(१) **निधीचे सदस्य व त्यांच्या कुटूंबियांसाठी पोलीस महासंचालकांच्या पूर्व संमतीने** रुग्णालये, दवाखाने, चिकित्सालय, प्रसुतिगृहे, कुटूंब नियोजन केंद्र, आरोग्य साधने, बालक मंदिरे, विश्रांतीगृह / पोलीस क्लब **/ पोलीस कॅन्टीन / उपहार गृह /क्षेत्रवसतीगृहे /बहुउद्देशिय सभागृह / मंगल कार्यालय /लॉन /स्वीमींगपुल /खेळाची मैदाने/पाळणाघर** शाळा (पोलीस पब्लीक स्कुल), इत्यादी बांधणे / **तयार करणे** व चालविणे इत्यादि सुखसोई **,अस्तित्वात असलेल्या इंधन आगाराची दुरुस्ती/देखभाल** तसेच पोलीस कल्याण निधी मंडळाचे अध्यक्ष तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे वेळोवेळी संमत करतील असे इतर उपक्रम.

**( दि.२४.११.२०१४ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं / २८-अे / ४९३७ / मपोकनिबै /४३९ / २००५, दि.१२.०२.२०१५ व क्र. पोमसं / २८ -अे /४९३७/मपोकनि/नियमावली/१००/२०१४, दि.१८/४/२०१५)**

(२) **यातील शाळकरी मुलांसाठी वाहनांची सोय करणेबाबतचा पहिला परिच्छेद**

**वगळण्यात आलेला आहे. ( दि. १३.८.२०१३ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं / २८-अे / ४९३७ / मपोकनिबै - इ - १२ / ४३९ / २००५, दि. ९. १०. २०१३. ) तथापि समादेशक रा.रा.पो.बल, गट १, पुणे/ गट ५, दौंड / गट ६, धुळे / गट ९, अमरावती / गट १२, हिंगोली / गट १४ (भाराब), औरंगाबाद आणि प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा व नानवीज-दौंड यांच्या विनंतीनुसार त्यांना या कार्यालयाच्या दि.२२.७.१४ च्या ज्ञापान्वये, ज्या घटक प्रमुखांना त्यांची कार्यालये संबंधीत शहरांपासून दूर अंतरावर कार्यान्वित असल्याने, किंवा अन्य कोणत्याही कारणांस्तव त्यांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांची मुले / मुलींची गैरसोय होऊ नये म्हणून स्कूल- बसची नितांत गरज आहे असे वाटते, त्या घटक प्रमुखांनी त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीमधून त्यासाठी स्वतंत्र बस खरेदी करावी, आणि ती बस, महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार व परिवहन प्राधिकरणाच्या (RTA) सुधारीत मार्गदर्शक तत्त्वांनुसार व इतर आवश्यक बाबींची पुर्तता करुन पूर्णतया केवळ स्कुलबसमध्ये परिवर्तीत करावी व त्याचा वापर केवळ शाळकरी मुलांसाठी शाळेत जाण्या-येण्याकरिता करावा, असे कळविले आहे.** (त्या बदल्यात इंधनावर होणा-या खर्चासाठी संबंधित पो.क.नि.सभासदांकडून गोळा होणारी रक्कम संबंधित घटक त्यांचे घटक पोलीस कल्याण निधीत जमा करतील. तसेच पोलीस विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय पोलीस वहान भाडेतत्वावर देण्यासाठी आकारण्यात येत असलेल्या प्रति कि.मी. प्रमाणेच्या प्रचलित दरानुसार येणारी रक्कम मोटार परिवहन विभागाकरिता शासन जमा करतील. ) त्याशिवाय सदस्याच्या मुलांसाठी अभ्यासिका, बालोद्याने, शाळकरी मुलांना मोफत दुध पुरवठा, मनोरंजन केंद्र, वाचनालये, रेडिओ व दूरदर्शन संच, ध्वनीवर्धक, पाण्याच्या टाक्या, जलशीतक, यासारख्या सुखसोयी, मध्यवर्ती पोलीस कल्याण मंडळाकडुन, प्रस्तावित आणि संमत केल्या जातील, अशा इतर सुखसोयी.

ई) **जाहिरातीसाठी पोलीस विभागाची जागा भाड्याने देण्याबाबतचा नियम <u>९ (१) (ई)</u> वगळण्यात आलेला आहे. ( दि. २४. ११. २०१४ च्या बैठकीतील निर्णय**

**आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं / २८-अे / ४९३७ / मपोकनिबै/ ४३९ /२००५, दि.१२.०२.२०१५ ).**

**(फ )** केवळ निधीच्या सदस्यांसाठीच म्हणून पोलीस क्लब आणि तत्सम सुखसोयी निर्माण करणे व त्यांचे परिरक्षण करणे.

**(ग)** पोलीस कल्याण निधीतून चालवण्यात येणारी पोलीस रुग्णालये व प्रसुतिगृहे किंवा दवाखाने यामध्ये पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांवर व त्यांच्या कुटूंबियांवर उपचार करणा-या डॉक्टरांना मानधन देणे.

**(ह )** निधीच्या सदस्यांना व त्यांच्या मुलांना कला, साहित्य, क्रिडा व खेळ यासाठी प्रोत्साहन व उत्तेजन या प्रयोजनास्तव, क्रिडा व खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी, खास शिक्षक, प्रशिक्षक व इतर क्रिडा अधिकारी / कर्मचारी यांना मानधन देण्यासाठी, यूनिट, परिक्षेत्र व राज्य पातळीवर पोलीस क्रिडा व खेळ आयोजित करण्यासाठी मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधून संबंधित घटकांच्या गरजेनुसार व उपलब्धतेनुसार निधी उपलब्ध करुन देता येईल.तसेच कला, साहित्य,क्रिडा व खेळ यात भाग घेण्यास चमू (महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर किंवा देशाबाहेर) पाठविण्यासाठी हा निधी वापरता येईल. परंतु जिल्हा / राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय पातळीवर कला, साहित्य, क्रिडा व खेळ आयोजित करणे किंवा घटकांच्या अधिकारक्षेत्राबाहेरील खेळात भाग घेण्यासाठी चमू / खेळाडू देशांतर्गत किंवा देशाबाहेर पाठविणे ह्या गोष्टी पोलीस महासंचालक यांच्या पूर्व मान्यतेशिवाय करता येणार नाहीत.

**(आय)** निधीच्या सदस्यांना शिवणयंत्रे खरेदी करण्यासाठी किंवा त्यांचे उत्पन्न वाढविण्याकरिता किफायतशीर उपक्रम सुरू करण्यासाठी कर्ज देणे, परंतू ते उपक्रम शासकिय कर्मचा-यांच्या सध्याच्या वर्तणूक नियमावली अन्वये अनुज्ञेय असले पाहिजेत.

**(जे )** सदस्यांचे कुटूंबिय व इतर यांना नोकरी करता येईल, असे सुसंघटीत लघुउद्योग व तत्सम प्रकल्प घटक मुख्यालयाच्या व इतर ठिकाणी सूरु करणे. मात्र निधीतून चालू करण्यात आलेल्या उपक्रमाच्या बाबतीत ते योग्य त-हेने पार पाडले जात आहेत, आणि त्यांचा हिशेब अंतर्गत व बाहेरील लेखा परिक्षकांकडून तपासले जात आहे, हे पाहण्याची काळजी घेण्यात येईल. खर्च, घसारा इत्यादीसाठी तरतूद केल्यानंतर अशा उपक्रमातून होणारा नफा निधीमध्ये जमा करण्यात यावा.

**(के)** **नियम ९ (१) (अ) ते (जे)** मध्ये नेमून दिल्यानुसार, प्रत्येक बाबतीत घटक कार्यालय प्रमुखांना (पोलीस अधीक्षक, समादेशक आणि प्राचार्य **) रु.१,५०,०००/-**हून अधिक खर्च होणार नाही, असे उपक्रम चालू करणे, सुखसोयी पुरविणे आणि कर्ज देण्याचे वित्तीय अधिकार असतील. रु. १,५०,०००/- हून अधिक परंतु **रु. २,५०,०००/-** पेक्षा अधिक नाही इतका खर्च होणारी प्रकरणे मान्यतेसाठी संबंधीत परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे पाठविण्यात येतील. अपर पोलीस महासंचालक / पोलीस आयुक्त / विशेष पोलीस महानिरीक्षक (घटक प्रमुख) यांना **रु. २,५०,०००/-** हून अधिक खर्च होणार नाही, असे उपक्रम चालू करणे, सुखसोयी पुरविणे आणि कर्ज देण्याचे वित्तीय अधिकार असतील. सर्व घटक प्रमुख रु. **२,५०,०००/-**पेक्षा जास्त खर्च होणारी प्रकरणे मान्यतेसाठी पोलीस महासंचालक कार्यालयाकडे पाठवतील. पोलीस महासंचालक कार्यालयातील अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांना **रु. १०,००,०००/-** पर्यंत आणि पोलीस महासंचालकांना **रु. १०,००,०००/-** पेक्षा अधिक खर्चाचे (मर्यादा नाही) वित्तीय अधिकार असतील. **(प्रस्तुत वित्तिय मर्यादा ह्या दि.२.६.२०१४पासुन अंमलात राहील.) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिबै/४३९/२००५, दि. ३१.०५.२०१४. )**

**(एल)** अनेक सेवानिवृत्त पोलीस शिपायांना मुले नसतात किंवा जवळचे नातेवाईक नसतात आणि त्यामुळे त्यांनी फक्त निवृत्तीवेतनावर आणि सेवानिवृत्तीनंतर मिळणा-या इतर निवृत्ती वेतन लाभावर अवलंबून रहावे लागते. त्यापैकी काही जणांकडे त्यांच्या वार्धक्यात कोणतेही उत्पन्नाचे साधन नसते आणि त्यामुळे औषधे इत्यादींचा खर्च करणे व तो भागविणे फारच कठिण जाते. म्हणून लायक व अन्यथा निराश्रित असतील, अशा सेवानिवृत्त पोलीसांना त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीतून अधिकतम रुपये ५,०००/- पर्यंतची ठोक रक्कम घटक प्रमुख देऊ शकतात. तथापि, ही रक्कम प्रत्येकांच्या बाबतीत फक्त एकदाच देण्यात येईल.

**(एम)** भाज्या व फुलांच्या बागा, फळबागा, शेतमळे, वस्तूभांडारे, पिठाच्या गिरण्या, धान्याची दूकाने, कुक्कूट पैदास क्षेत्रे, दुग्ध शाळा, इंधन आगारे, **<u>(फक्त सध्या अस्तित्त्वात असलेले पेट्रोल पंप आणि गॅस एजन्सी)</u> (या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं /२८-अे/ ४९३७ / मपोकनि / नियमावली / १०० /२०१४, दि.१८/४/२०१५)** बेकऱ्या आणि

पोलीस कल्याण निधीची साधन संपत्ती ज्यामुळे वाढेल असे तत्सम व्यवसाय चालवणे.

**(एन)** सदस्य व त्यांचे कुटूंबिय यांच्या हितासाठी शिवणकाम, हस्तव्यवसाय, हवाबंदकरण, सुतारकाम व तत्सम व्यवसाय यांचे प्रशिक्षण वर्ग चालविणे.

**(२) (अ)** **निधीतून सदस्यांना पुढील अपवादात्मक प्रसंगी अग्रिम देता येतील :-**

कर्तव्यासाठी म्हणून ब-याच मोठया संख्येने पोलीस शिपायांना तात्काळ बाहेर पाठविणे भाग असते आणि जेव्हा कोषागारातून किंवा स्थायी अग्रिमातून ( Permanent advance) प्रवासभत्ता अग्रिम देणे शक्य नसते, अशा अत्यंत निकडीच्या प्रसंगी निधीतून अग्रीम देता येईल. तथापि कोषागारातून प्रवासखर्च अग्रिम काढल्यानंतर लगेच त्यांची प्रतिपूर्ती केली जाईल, असे अग्रिम अपवाद म्हणून दिले जाईल. नियम म्हणून नाही.

**(ब)** क्षयरोग, कर्करोग, पोलिओ, अर्धांगवायू, पक्षाघात, फुफ्फुस/हृदयविकार/मेंदू/किडणीशी संबंधीत आजार, एचआयव्ही पॉझीटीव्ह, कॉक्लीयर इम्प्लांट व इतर सर्व भविष्यातील संभाव्य अज्ञात गंभीर आजार झालेल्या पोलीस कल्याण निधींच्या सदस्यांना (व **त्यांच्या कुटुंबियांच्या)** उपचाराकरिता (पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचेबाबतीत शासनमान्य महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेमध्ये अंतर्भुत नसलेले सर्व गंभीर आजार), **पोलीस कल्याण निधी नियमांतील वित्तिय प्राधिकारा नुसार अग्रिम देता येईल.** **(दि.२४.११.२०१४ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र.२८-अे/४९३७/मपोकनिबै/४३९/२००५,दि.१२.०२.२०१५).** तथापि एक अग्रिम /कर्जाची पुर्णपणे परतफेड झाल्याशिवाय दुसरे अग्रीम / कर्ज देता येणार नाही. तसेच वैद्यकिय प्रतिपूर्ती बिले पास होताच, अशी अग्रिमे संपूर्णतः वसूल केली जातील. मात्र कोणत्याही कारणास्तव प्रतिपूर्तीद्वारे विहित कालावधीत परतफेड न झाल्यास संबंधीत अग्रीमधारकांच्या वेतनातून अग्रीम रक्कम, व्याजासह वसूल केली जाईल.

**(३)** आत्यंतिक अनुकंपा म्हणून एखाद्या सदस्याला घटक निधी प्रशासक हे त्यांच्या वित्तिय प्राधिकारानुसार अग्रीम मंजूर करु शकेल. सदरचे अग्रीम १८ महिन्यापर्यंत बिनव्याजी असेल. तसेच अग्रीमाची वसुली अग्रीम मंजूरीच्या ३ महिन्यांनंतर संबंधित अग्रीम धारकाच्या वेतनातून कपात करण्यास सुरुवात करावी. त्यानंतरच्या

कालावधीत परतफेड करावयाच्या कर्जाच्या रकमेवर द.सा.द.शे. १०% दराने व्याज आकारण्यात येईल.

(४) या नियमाच्या पोटनियम (१) च्या खंड (अ) व पोटनियम (२) च्या खंड (ब) मध्ये उल्लेखिलेल्या ज्या वैद्यकिय सुविधांसाठी अग्रीम / कर्ज अनुज्ञेय आहे, त्यासाठी मध्यवर्ती पोलीस कल्याण मंडळ अध्यक्ष, वेळोवेळी सर्वसाधारण आदेशाद्वारे किंवा एखाद्या प्रकरणी विशेष आदेशाद्वारे नेमून देईल, अशा निर्बधांच्या अधीनतेने, निधीतून कर्जाएवढी रक्कम अनुदानाच्या रुपात आर्थिक सहाय्य म्हणून देऊ शकेल किंवा काही अपवादात्मक परिस्थितीत आत्यंतिक अनुकंपा म्हणून तेवढी रक्कम किंवा त्यावरील व्याजाची रक्कम निर्लेखित करु शकेल.

(५) पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाचे अधिकारी / कर्मचारी हे निधीचे फायदे घेण्यास पात्र राहतील. तसेच पोलीस उप अधीक्षक या पदावरील एक टप्पा पदोन्नतीवर असलेले पोलीस निरीक्षक यांना जोपर्यंत पोलीस उप अधीक्षक / सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावर नियमित पदोन्नती मिळत नाही, तोपर्यंत त्यांनाही उपरोक्त उपक्रमांतर्गत मिळणाऱ्या सर्व सोयी सुविधा अनुज्ञेय असतील.

पोलीस निरीक्षकापेक्षा वरील दर्जाचे पोलीस कल्याण निधीचे सर्व सभासद हे फक्त पोलीस क्लब, हॉलिडे होम, कक्षबंध, इत्यादी ठिकाणी भाडयाने सवलतीचे दर आणि सेवा आकार देऊन राहणे या गोष्टी वगळता, निधीतून वर उल्लेखिलेल्या सुखसोयी व सुविधांचा लाभ घेण्यास पात्र असणार नाहीत.

(१०) **<u>निधीचे लेखे, लेखापरीक्षा, अभिलेख, नोंदवह्या, मानधन इत्यादी</u> :-**

(१) पोलीस महासंचालक, अभिलेख व नोंदवहया ठेवण्याबाबतचे नियम विहित करुन लेखांकनाची व लेखापरिक्षणाची पध्दत आणि त्यासाठी नियुक्त करण्यात येईल, त्या कर्मचाऱ्यांना द्यावयाचे मानधन विहित करुन, निधीच्या यथोचित कारभारासाठी वेळोवेळी योग्य ते आदेश देतील.

(२) घटक मुख्यालयात जडवस्तुसंग्रह नोंदवही व रोकड वही ठेवली जाईल. उप-घटक मुख्यालयात वेगळी रोकडवही ठेवण्यांत येईल.

(३) पोलीस कल्याण निधीतून केले जाणारे व्यवहार शासकिय व्यवहारापासून वेगळे ठेवण्यांत येतील.

(४) घटक मुख्यालयामध्ये आणि पोलीस ठाण्यांसारख्या उप-घटकामध्ये ठेवलेले लेखे, अभिलेख

नोंदवह्या, निरीक्षक अधिका-यांकडून त्यांच्या वार्षिक तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. प्रत्येक घटक पोलीस कल्याण निधीतील संपुर्ण लेख्यांची वार्षिक तपासणी करुन, त्याबाबतचा अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविण्याची जबाबदारी ही संपुर्णतः संबंधीत घटक प्रमुखांची राहील.

(५) मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी आणि घटक पोलीस कल्याण निधी यांचे लेखे महालेखापाल, महाराष्ट्र यांच्या बाह्य लेखापरिक्षा विभागांकडून तपासण्यात येतील.

(६) पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयात रोखपाल म्हणून काम करणारा लिपीक मध्यवर्ती पो.क. निधीचे लेखे ठेवील आणि त्यासाठी त्याला निधीतून दरमहा रु.५००/- इतके मानधन देण्यात येईल.

(७) घटक पोलीस कल्याण निधीचे लेखे घटक कार्यालयाच्या लेखा शाखेद्वारे सोयीनुसार ठेवले जातील व लेखापाल व त्यांचा १ सहाय्यक यांना निधीतून दरमहा प्रत्येकी रु. ५००/- इतके मानधन देण्यात येईल.

(८) तसेच निधीच्या प्रशासनाबाबतचे काम करणाऱ्या लिपीकाला पोलीस कल्याण निधीतून खालीलप्रमाणे मानधन देण्यात येईल :-

(१) **पोलीस महांचालक यांचे कार्यालय :-**

१) पोलीस कल्याण निधी शाखेचे कार्यासन अधिकारी - दरमहा रुपये ५००/-

२) पोलीस कल्याण निधी शाखेतील १ लिपीक - दरमहा रुपये ५००/-

(२) **निधी अस्तित्वात असेल अशी इतर सर्व कार्यालये :-**

प्रत्येक कार्यालयातील पोलीस कल्याण निधीचे कामकाज हाताळणारे १ लिपीक किंवा १ पोलीस कर्मचारी - दरमहा रुपये ५००/-

## ११. पोलीस कल्याण निधी नियम तयार करण्याचे प्राधिकार :-

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम,२३(ड) अंतर्गत, राज्याच्या पोलीस दलाकरीता नियम तयार करण्याचे अधिकार, पोलीस दलाच्या प्रशासनासंबधिच्या कोणत्याही प्रयोजनासाठी कोणताही निधी स्थापन करणे, त्यांची व्यवस्था पहाणे व त्यांचे विनियमन करण्याचे अधिकार हे पोलीस महासंचालक यांना शासनाने प्रदान केलेले आहेत. महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली ही पोलीस कर्मचा-यांचे कल्याण आणि पोलीस कल्याण निधीतील वित्तीय बाबींचे विनियमन करण्याचे उद्देशाने तयार करण्यात आलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र पोलीस कल्याण मंडळ समीती बैठकीतील ठरावानुसार, पोलीस कल्याण निधीचे नियम तयार करणे, वगळणे किंवा त्यात बदल करणे हे अधिकार मंडळाचे अध्यक्ष

तथा पोलीस महासंचालक यांना राहतील. मात्र, केलेल्या बदलांची माहिती वेळीच शासनास अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक राहील.

## १२. <u>निरसन व व्यावृत्ती</u> :-

विद्यमान महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियम जेथपर्यंत या नियमांच्या उपबंधांना प्रतिकूल किंवा विसंगत असतील तेथपर्यंत हे नियम विद्यमान नियमांना अधिभावी ठरतील.

परंतू असे कि, विद्यमान नियमांच्या अनुरोधाने केलेली कोणतीही कृती, ती केवळ नियमांच्या उपबंधांच्या विरुध्द किंवा त्यांच्याशी विसंगत आहे म्हणून विधी अग्राह्य होणार नाही.

---ooo---

# परिशिष्ट 'अ'
## सदस्यत्व स्वीकृती प्रतिज्ञापत्र

मी ________________________________ (पूर्ण नाव) पोलीस कल्याण निधीची नियमावली व नियम वाचल्यानंतर व पुर्णतः समजून घेतल्यानंतर उक्त निधीत सामील होण्यास स्वेच्छेने संमती देत आहे. कल्याण निधीच्या नियमावलीत विहित केलेल्या नियमांनुसार वर्गणी देण्यास माझी संमती आहे. मी, असेही संमत करतो की, मध्यवर्ती पोलीस कल्याण मंडळ वेळोवेळी विहीत करील असे वर्गणीच्या दरांमधील कोणतेही बदल, मी स्वीकारीन, माझ्या वेतनातून दर चार महिन्यांनी, त्यावेळी माझ्याकडून देय असलेली वर्गणी कापून घेण्यास माझी अनुमती आहे. मी आणखी असेही कबूल करतो की, मी जोपर्यंत पोलीस विभागात सेवा करीत आहे, तोपर्यंत माझे सदस्यत्व मागे घेणार नाही.

**घोषित करणा-या व्यक्तीची सही**

**ठिकाण :-** **संपूर्ण नाव :-**

**दिनांक :-** **धारण केलेले पद :-**

**वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रतिस्वाक्षरी**

**परिशिष्ट- “क”**

**मागणी व नोंदवही क्र........**

**वरिष्ठ अधिका-याची प्रतिस्वाक्षरी :-**

# परिशिष्ट 'ब'

## घटक

पोलीस ठाणे

मागणी नोंदवही

३० एप्रिल २०_____

३१ ऑगस्ट २०____

३१ डिसेंबर २०___ रोजी संपणा-या चौमाहीची पोलीस कल्याण निधीसाठी वर्गणी

| अ. क्र. | ज्यांनी वर्गणी द्यायला पाहिजे अशा व्यक्तींची नावे | धारण केलेले पद | गोळा केलेली रक्कम | | अध्यक्षांकडे भरणा केलेली रक्कम | | अदत्त रक्कम / शेरा असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पोलीस कल्याण निधी | पावती क्रं. व दिनांक | पोलीस कल्याण | अध्यक्षांच्या पोचपावती चा क्र. व दिनांक | |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| ७ | | | | | | | |
| ८ | | | | | | | |

# परिशिष्ट 'क'

## पावती

**पोलीस कल्याण निधी वर्गणी पावती**

श्री.________________________________ (पदनामासह)

यांचेकडुन पोलीस कल्याण निधीची माहे, --------२०__ ते माहे, ---------२०__ पर्यंतच्या चौमाही कालावधीची वर्गणीची एकूण रूपये --------------------- (अक्षरी रूपये -------- ----------------------------------------- ) इतकी रक्कम मिळाली.

दिनांक : . .२०

वर्गणी गोळा करणा-या अधिका-यांची सही

---०००---

# परिशिष्ट 'ड'

कॅश मेमो

अनुक्रमांक :-

दिनांक :-

प्रति,

अध्यक्ष,
मध्यवर्ती / घटक पोलीस कल्याण निधी समिती.

महोदय,

मी, यासोबत, पोलीस कल्याण निधीची माहे,________२०____ ते माहे, ________२०____ या कालावधीची वर्गणी म्हणून सदस्यांकडून गोळा केलेली एकूण रुपये ___________(अक्षरी रूपये ______________________________________) इतकी रक्कम मध्यवर्ती/घटक पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी सादर करीत असून, कृपया पोच द्यावी, ही विनंती.

आपला

(सही)

# परिशिष्ट 'इ'

**पोलीस कल्याण निधीच्या रक्कमेची पोचपावती :-**

जमा नोंद क्रमांक :-

दिनांक :-

श्री/श्रीमती___________________________________पोलीस फौजदार / मंडळ पोलीस निरीक्षक (पदनाम) यांचेकडून पोलीस कल्याण निधीची माहे,________२०____ ते माहे, ________२०____ या चौमाही कालावधीची वर्गणी म्हणून रुपये _________/(अक्षरी रुपये _______________________________________________) इतकी रक्कम मिळाली.

रोखपाल :-

निधी प्रशासक

प्रति,
फौजदार / मंडळ पोलीस निरीक्षक.

---ooo---